# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.09.2025** **वारःरवीवार**

---

१. कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो – मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

२. सातारा, सांगली, नांदेड आणि परभणी जिल्ह्यातल्या अतीवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईला मंजुरी

३. शारदीय नवरात्रोत्सवासाठी राज्यातली शक्तीपीठं सज्ज

४. वर्ष २०२३ साठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार मल्याळी अभिनेते मोहनलाल यांना जाहीर आणि

५. महिला क्रिकेटमध्ये भारताविरुद्ध मर्यादित षटकांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाचा विजय

**<u>मुख्यमंत्री</u>**

कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीतून देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. इंडियन पोलीस फाऊंडेशनच्या १०व्या स्थापना दिनानिमित्त काल मुंबईत भारताच्या आर्थिक विकासासाठी पोलीस दलाची पुनर्कल्पना या विषयावरील चर्चासत्रात मुख्यमंत्री बोलत होते.

बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील गुन्ह्यांची उकल करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं अत्यावश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे सामाजिक न्याय राज्यमंत्री असीम अरूण, इंडियन पोलीस फाउंडेशनचे प्रमुख आर.एस. मुशहारी आणि वरीष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

**<u>नुकसान भरपाई</u>**

सातारा, सांगली, नांदेड आणि परभणी जिल्ह्यात जून ते ऑगस्ट दरम्यान अतीवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एकंदर ६८९ कोटी रुपयांपेक्षा अधिक भरपाई देण्याला राज्य शासनानं मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी केल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

पिकांच्या नुकसानाबाबतचा पंचनामा अहवाल प्राप्त झाल्यावर लगेचच राज्य शासनानं या मदत निधीला मंजुरी दिली असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलेल्या मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज अथवा अन्य वसुलीसाठी वळता करू नये असे निर्देश संबधित जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना द्यावेत, अशा स्पष्ट सूचनाही दिल्याचं जाधव-पाटील म्हणाले.

**<u>शिवारफेरी</u>**

राज्यातील एकही अतिवृष्टीबाधित शेतकरी भरपाईपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि राज्याच्या कृषी विभागातर्फे आयोजित शिवार फेरी आणि चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. कृषी विद्यापीठाच्या नवनवीन वाणांच्या संशोधनाची माहिती आणि लाभ शिवार फेरीत शेतकऱ्यांना होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>शैप्रयोग</u>**

शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग आयोजित राज्यस्तरीय दोन दिवसीय शालेय शिक्षण परिषद काल पुण्यामध्ये पार पडली. या परिषदेत विविध तज्ज्ञांनी नवीन शिक्षण धोरण, परख सर्वेक्षण अहवाल, प्रशासकीय सुधारणा, समग्र शिक्षण आणि विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबविलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगांची माहिती दिली.

**<u>कॅप्सूल</u>**

**<u>सेवा पर्व - शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुरक्षितता</u>**

सेवा आणि सुशासन, म्हणजेच सार्वजनिक सेवा आणि सुशासन या मंत्रानं मार्गदर्शित, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. आज, - 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत, ऐकुया सरकारनं शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुरक्षितता कशी भक्कम केली आहे ते ..

शेतकरी आपल्या देशाच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, केंद्रित सुधारणांच्या प्रवाहाद्वारे शेतकरी अनियमित उत्पन्नापासून खात्रीशीर समृद्धीकडे प्रगती करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटल्याप्रमाणे...

अर्थसंकल्पीय वाटपात २०१३-१४ मधील २७ हजार कोटी रुपयांवरून आज १ लाख ३७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढ करण्यात आली आहे. PM-KISAN द्वारे, ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट उत्पन्नाचा आधार मिळाला आहे. किसान क्रेडिट कार्डमुळं आर्थिक सक्षमीकरण अधिक भक्कम झालं आहे, तर प्रधानमंत्री फसल विमा योजना हवामान आणि बाजारपेठेच्या अनिश्चिततेमध्ये सुरक्षितता प्रदान करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली, भारताच्या शेतकऱ्यांचा प्रवास अन्न सुरक्षिततेपासून समृद्धीकडे चांगल्या प्रकारे सुरू आहे, त्यामागे रुजलेला दृष्टिकोन, कृतीची जोड आणि अन्नदातांच्या स्वप्नांची प्रेरणा आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, प्रशांत जाधव, पुणे.

**<u>नवरात्रदर्शन</u>**

नवरात्र महोत्सवासाठी राज्यातील शक्तीपीठांची मंदिरं सज्ज झाली आहेत. उद्यापासून सुरू होणाऱ्या या महोत्सवात कोल्हापुरात अंबाबाईच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुलभतेनं दर्शन घेता यावं यासाठीची सर्व व्यवस्था देवस्थान समिती आणि महापालिकेनं केली आहे. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल मंदिर परिसराला भेट देऊन उत्सवाच्या तयारीची पाहणी केली. लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहेत. इतर गावांमधून येणाऱ्या भाविकांसाठी वाहनतळ, स्वच्छतागृह आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून वाहन तळापासून मंदिर परिसरात जाण्यासाठी सार्वजिक वाहतूक व्यवस्थाही तैनात करण्यात आली आहे.

अंबाबाईच्या पूजा, दशमहाविद्यापैकी ७ स्वरूपात बांधण्यात येणार असल्याची माहिती श्री पूजक मंडळातर्फे देण्यात आली. कोल्हापूरची ओळख असलेल्या ऐतिहासिक शाही दसरा महोत्सवाच्या बोधचिन्हाचं अनावरण काल पालकमंत्री प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते झालं.

**<u>नवरात्र तुळजापूर</u>**

नवरात्र उत्सवात भाविकांच्या सोयीसाठी तुळजापूर आगारात ५० नव्या बस दाखल होणार आहेत. घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत तुळजापूर-सोलापूर, तुळजापूर-धाराशिव, तुळजापूर-लातूर, तुळजापूर-कोल्हापूर या मार्गांवर बसच्या दररोज सुमारे २०० फेऱ्या होणार आहेत.

तसंच तुळजापूरमधील मुख्य बसस्थानकाला 'श्री तुळजाभवानी बसस्थानक' तर नूतनीकरण करण्यात आलेल्या जुन्या बसस्थानकाला 'छत्रपती संभाजी महाराज बसस्थानक' अशी नवी नावं देण्यात आली आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल ही माहिती दिली.

माहुरचं रेणुका माता मंदिर आणि वणीच्या सप्तशृंगी देवी मंदिरातही नवरात्रोत्सवानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे.

**<u>साउंडबाइट</u>**

सरकारनं अलीकडेच दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील जीएसटी दर कमी केल्याचा थेट लाभ ग्राहकांना आणि विशेषत्वानं गृहिणींना मिळणार आहे. या अनुषंगानं पुण्यातील गृहिणी श्रद्धा साळवेकर यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.........

**<u>स्क्रिप्ट :</u>**

उद्यापासून स्त्री शक्तीचा जागर सुरु होत असून या मुहूर्तापासून वस्तु आणि सेवा कर या अंतर्गत बहुतेक उत्पादने आता 5 आणि 18 टक्क्यांमध्ये आल्यामुळे खरं सांगायचं तर .......आमच्यासारख्या गृहिणींना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. रोजच्या गरजेच्या वस्तू म्हणजे किराणा सामान, अन्नपदार्थ , कपडे , घरगुती उपकरणं यांचे दर कमी झाल्याने घरखर्च सांभाळणे तुलनेने सोपे झाले आहे.......आणि या निर्णयाचा निश्चितच मोठा फायदा होईल. मुलांच्या शालेय वस्तू खरेदीपासून स्वयंपाकघरातील सामानापर्यंत थोडी बचत करताना आणि घर चालवताना मिळालेली ही सवलत आमच्यासाठी महत्त्वाची आहे. यासाठी मी मनापासून सरकारचे आभार मानते.

**<u>इंट्रो-</u>**

बदलती जागतिक आणि राष्ट्रीय परिस्थिती तसंच पंतप्रधान, गृहमंत्री आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सतत केलेली विनंती लक्षात घेता शस्त्रे टाकून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतल्याचे बंदी घातलेल्या सीपीआय

(माओवादी) गटानं म्हटलं आहे.  सीपीआय (माओवादी) पॉलिटब्युरो सदस्य मल्लाजुला वेणुगोपाल राव यांनी एका ध्वनीमुद्रित संदेशात सांगितलं की, पक्षानं सशस्त्र संघर्षावर तात्पुरती युद्धबंदी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्ती किंवा शिष्टमंडळांसोबत आपण चर्चेसाठी तयार असल्याचंही त्यांनी सांगितलं...

**<u>कोमसाप</u>**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय समितीच्या अध्यक्षपदी नमिता कीर यांची आणि कार्याध्यक्षपदी प्राध्यापक डॉक्टर प्रदीप ढवळ यांची निवड झाली आहे. परिषदेची केंद्रीय वार्षिक सर्वसाधारण सभा काल सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ इथं झाली. या सभेत पुढील तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. मंत्री उदय सामंत आणि आमदार संजय केळकर यांची कोमसापचे विश्वस्त म्हणून निवड केल्याचं डॉक्टर ढवळ यांनी सांगितलं. कोमसापतर्फे देण्यात येणाऱ्या वर्ष २०२३-२४ साठीच्या विविध पुरस्कारांची घोषणा यावेळी करण्यात आली.

**<u>दादासाहेबफाळकेपुरस्कार</u>**

२०२३ या वर्षासाठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ मल्याळी अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते मोहनलाल यांना प्रदान केला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं समाज माध्यमावरील संदेशात ही माहिती दिली आहे.

परवा २३ तारखेला नवी दिल्लीत होणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहोळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोहनलाल यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघांमधला ५० षटकांचा तिसरा आणि निर्णायक सामना काल ऑस्ट्रेलियानं ४३ धावांनी जिंकला. तीन सामन्यांच्या या मालिकेतही ऑस्ट्रेलियाच्या महिला संघानं २-१ असा विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाच्या महिला संघानं ४८ षटकांत सर्व गडी बाद  ४१२ धावा केल्या.  विजयासाठी ४१३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय महिला संघाचे सर्व फलंदाज ३६९ धावांवर बाद झाले.

**<u>आशियाचषक</u>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोरमध्ये भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकदा आमने सामने येणार आहेत. दुबईमध्ये भारतीय  प्रमाण  वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरू होईल. या स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला होता.

**हवामान**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या अनेक भागात काल दुपारपासून जोरदार पाऊस पडला. राज्यातल्या सर्वच विभागात आज तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.